# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मौजा-गोरेवाडा सं. नं. ५८, ५८/१,२,३, (भाग) न.भु.क्र. २०७ व २०८
**{स्थावर विभाग}** जागेवरील आरक्षण क्र. MNW-१ दफनभूमी (B.G.) १.६३२ हे. आर. जागेपैकी ५०% (०.८१६ हे. आर.) महानगरपालिकेच्या मालकीची जागा मुस्लिम समाज दफनभुमी करीता १० वर्ष कालावधीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न विचारत घेणे.

नागपूर शहराचे मंजुर विकास आराखडयातील मौजा-गोरेवाडा सं. नं. ५८, ५८/१,२,३, (भाग) न.भु.क्र. २०७ व २०८ जागेवरील आरक्षण क्र. MNW-१ दफनभूमी (B.G.) १.६३२ हे. आर. जागेपैकी ५०% (०.८१६ हे.आर.) महानगरपालिकेच्या मालकीची जागा मुस्लिम समाजाचे दफनभुमीकरीता वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान सोसायटीला खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन विषयाचे प्रस्तावास मा. आयुक्त तथा प्रशासक महोदयांची मंजूरी नंतर देण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

I. वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेकडे दयावयाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची राहील व वापर महानगरपालिकेच्या अखत्यारीत असून नागपूर मुस्लीम समाज संस्था देखभाल/दुरुस्ती करीता संनियंत्रण राहील.

II. वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेला संनियत्रणातर्गत जागा देण्याचे झाल्यास, नगर भुमापन विभागाकडुन जागेची मोजणी करुन व सीमांकन करावे लागेल.

III. सदर्हु जागा वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेला देण्यापूर्वी उक्त जागेवरील करण्यात येत असलेला विकासासंबंधाने सक्षम प्राधिकरणाकडून मंजुरी घेणे आवश्यक राहील.

IV. सदर्हु जागा वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेला दयावयाची झाल्यास, सदर जमीन मनपाचे पूर्व परवानगी शिवाय कोणालाही हस्तांतरीत करता येणार नाही.

V. सदर्हु जागा दफनभूमी (B.G.) प्रयोजनांतर्गत असून या आरक्षणांतर्गत अनुज्ञेय वापर करणे बंधनकारक राहील.

VI. उपरोक्त अटी शर्तीचा शर्तभंग केल्यास जमीन व त्यावरील असलेल्या वास्तु व बांधकाम यासह मनपास परत घेण्याचा अधिकार राहील.

VII. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ तसेच महाराष्ट्र प्राधिकरण व नगर रचना अधिनियम १९६६ या सर्व अधिनियमातील तरतुदी संस्थेला बंधनकारक राहील.

VIII. सदर्हु जागेवर कोणतेही बांधकाम करावयाचे झाल्यास UDCPR चे तरतुदीन्वये अनुज्ञेय विकास कामासाठी सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेणे आवश्यक राहील व त्यास मा.आयुक्त महोदयांची मान्यता असणे आवश्यक राहील.

IX. सदर्हु जागा वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेकडे मुस्लिम कब्रस्थान वापरासाठी राहील. यात कुठलाही सामाजिक वाद उद्भवल्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

X. सदर्हु जागेवर केलेल्या वास्तु/इमारतीची देखभाल/दुरुस्ती, संनियत्रण, स्वच्छता राखण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

XI. सदर्हु जागेविषयात संबंधीत संस्थेस विद्युत कर, पाणी कर, मालमत्ता कर व या जमिनीवर आकारण्यात येणाऱ्या इतर शासकीय कर भरण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

XII. सदर जागा फक्त कब्रस्थानाच्या वापरा करीताच राहील. त्या व्यतिरिक्त दूसरा वापर करता येणार नाही.

XIII. सदर जागेचा वापर व्यावसायिक पद्धतीने करता येणार नाही, त्यापासून कोणतेही उत्पन्न घेता येणार नाही.

मौजा-गोरेवाडा सं. नं. ५८, ५८/१,२,३, (भाग) न.भु.क्र. २०७ व २०८ जागेवरील आरक्षण क्र. MNW-१ दफनभूमी (BG) १.६३२ हे. आर. जागेपैकी ५०% (०.८१६ हे. आर.) महानगरपालिकेच्या मालकीची जागा मुस्लिम समाज दफनभुमी १० वर्ष कालावधीकरीता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

# <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 29/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 11/01/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता) , स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा-गोरेवाडा सं. नं. ५८, ५८/१,२,३, (भाग) न.भु.क्र. २०७ व २०८ जागेवरील आरक्षण क्र. MNW-१ दफनभूमी (B.G.) १.६३२ हे. आर. जागेपैकी ५०% (०.८१६ हे. आर.) महानगरपालिकेच्या मालकीची जागा मुस्लिम समाज दफनभुमी करीता १० वर्ष कालावधीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न विचारत घेऊन,

नागपूर शहराचे मंजुर विकास आराखडयातील मौजा-गोरेवाडा सं. नं. ५८, ५८/१,२,३, (भाग) न.भु.क्र. २०७ व २०८ जागेवरील आरक्षण क्र. MNW-१ दफनभूमी (B.G.) १.६३२ हे. आर. जागेपैकी ५०% (०.८१६ हे.आर.) महानगरपालिकेच्या मालकीची जागा मुस्लिम समाजाचे दफनभुमीकरीता वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान सोसायटीला खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन विषयाचे प्रस्तावास मा. आयुक्त तथा प्रशासक महोदयांची मंजूरी नंतर देण्यात येईल.

**<u>अटी व शर्ती</u> :-**

I. वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेकडे दयावयाची जागा महानगरपालिकेच्या मालकीची राहील व वापर महानगरपालिकेच्या अखत्यारीत असून नागपूर मुस्लीम समाज संस्था देखभाल/दुरुस्ती करीता संनियंत्रण राहील.

II. वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेला संनियत्रणातर्गंत जागा देण्याचे झाल्यास, नगर भुमापन विभागाकडुन जागेची मोजणी करुन व सीमांकन करावे लागेल.

III. सदर्हु जागा वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेला देण्यापूर्वी उक्त जागेवरील करण्यात येत असलेला विकासासंबंधाने सक्षम प्राधिकरणाकडून मंजुरी घेणे आवश्यक राहील.

IV. सदर्हु जागा वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेला दयावयाची झाल्यास, सदर जमीन मनपाचे पूर्व परवानगी शिवाय कोणालाही हस्तांतरीत करता येणार नाही.

V. सदर्हु जागा दफनभूमी (B.G.) प्रयोजनांतर्गत असून या आरक्षणांतर्गत अनुज्ञेय वापर करणे बंधनकारक राहील.

VI. उपरोक्त अटी शर्तीचा शर्तभंग केल्यास जमीन व त्यावरील असलेल्या वास्तु व बांधकाम यासह मनपास परत घेण्याचा अधिकार राहील.

VII. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ तसेच महाराष्ट्र प्राधिकरण व नगर रचना अधिनियम १९६६ या सर्व अधिनियमातील तरतुदी संस्थेला बंधनकारक राहील.

VIII. सदर्हु जागेवर कोणतेही बांधकाम करावयाचे झाल्यास UDCPR चे तरतुदीन्वये अनुज्ञेय विकास कामासाठी सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेणे आवश्यक राहील व त्यास मा.आयुक्त महोदयांची मान्यता असणे आवश्यक राहील.

IX. सदर्हु जागा वेस्ट नागपूर मुस्लिम कब्रस्थान संस्थेकडे मुस्लिम कब्रस्थान वापरासाठी राहील. यात कुठलाही सामाजिक वाद उद्भवल्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

X. सदर्हु जागेवर केलेल्या वास्तु/इमारतीची देखभाल/दुरुस्ती, संनियत्रण, स्वच्छता राखण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

XI. सदर्हु जागेविषयात संबंधीत संस्थेस विद्युत कर, पाणी कर, मालमत्ता कर व या जमिनीवर आकारण्यात येणाऱ्या इतर शासकीय कर भरण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

XII. सदर जागा फक्त कब्रस्थानाच्या वापरा करीताच राहील. त्या व्यतिरिक्त दूसरा वापर करता येणार नाही.

XIII. सदर जागेचा वापर व्यावसायिक पद्धतीने करता येणार नाही, त्यापासून कोणतेही उत्पन्न घेता येणार नाही.

मौजा-गोरेवाडा सं. नं. ५८, ५८/१,२,३, (भाग) न.भु.क्र. २०७ व २०८ जागेवरील आरक्षण क्र. MNW-१ दफनभूमी (BG) १.६३२ हे. आर. जागेपैकी ५०% (०.८१६ हे. आर.) महानगरपालिकेच्या मालकीची जागा मुस्लिम समाज दफनभुमी १० वर्ष कालावधीकरीता देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.